# माध्यमिक व उच्च माध्यमिक ग्रंथपाल संघटना बैठक दि.०४/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | --- | --- | --- |
| २. | शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व शिक्षा अभियानांतर्गत इ. ६ वीची व इ.९-१० वीची पुस्तके पुरेशा प्रमाणात मिळणेबाबत. | इ. १ ते ८ वीसाठी सर्व शिक्षा अभियानातून पुरेशी पुस्तके मिळण्याबाबत आवश्यक मागणी शिक्षणाधिकारी यांचेकडे करावी. याबाबत संघटनेने पाठपुरावा करावा. तसेच शिक्षणाधिकारी यांनी प्राप्त पुस्तक संचाचे वेळेत वितरण करावे. शाळांनी गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत मागणी करणेबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकडून परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. संचालनालयाच्या परिपत्रकानुसार अ.जा./अ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा.भ.ज. या प्रवर्गातील एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना पुस्तक पेढीद्वारे इ.९-१० वीची पुस्तके द्यावयाची असल्याने पात्र विद्यार्थ्यांना उपलब्ध संच वितरित होतील, याची दक्षता घ्यावी. पुस्तक वाहतुकीसाठी तालुका मुख्यालय ते केंद्र मुख्यालय हा खर्च गटशिक्षणाधिकारी यांचेकडून करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांचेकडून कळविण्यात यावे. | शाळा / शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ३. | से.नि. अर्धवेळ ग्रंथपालांना शिल्लक रजेचे रोखीकरण होवून मिळणेबाबत. | संघटनेने निवेदन या कार्यालयास दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ४. | शासन निर्णयानुसार पदवीधर वेतनश्रेणी वेतन निश्चिती करून मिळणेबाबत. | लेखाधिकारी, लेखा परीक्षण पथक (शिक्षण) यांनी प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करावी. | लेखाधिकारी स्तरावर | --- |
| ५. | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील अर्धवेळ ग्रंथपालांच्या रजेबाबत आपल्या स्तरावरून अद्याप का कार्यवाही झालेली नाही. | संघटनेने निवेदन या कार्यालयास दिल्यास तसे संस्थेस शिक्षणाधिकारी यांचेकडून कळविण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ६. | रयत शिक्षण संस्थेतील ग्रंथपालांच्या बदलीबाबत व विद्यालयात संस्थेकडून आलेली स्टेशनरी विक्री व इतर प्रकारच्या चार्जबाबत सक्ती केली जाते. त्याबाबत आपल्या स्तरावर योग्य ते आदेश व्हावेत. | संघटनेने निवेदन या कार्यालयास दिल्यास तसे संस्थेस शिक्षणाधिकारी यांचेकडून कळविण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ७. | अर्धवेळ मधून पूर्णवेळ मध्ये उन्नयन झालेल्या ग्रंथपालांचे प्रा.फंड खाते तात्काळ चालू | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेश / सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. | शासन स्तरावर | वरिष्ठ कार्यालयाच्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करणेबाबत. | | | आदेशानंतर |
| ८. | एकाकी पदाच्या ग्रेड पेबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी. | हा विषय कार्यबळ गटाच्या बैठकीत घेण्यात येईल. शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी / लेखाधिकारी स्तरावर | शासन आदेशानंतर |
| ९. | चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार १००० विद्यार्थी संख्या पूर्ण असणाऱ्या वर्षापासून पूर्णवेळ नियुक्ती होणेविषयी. | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेश / सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. | शासन स्तरावर | वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानंतर |
| १०. | ग्रंथपाल पदावरील कर्मचाऱ्यांना ग्रंथालयाशिवाय अन्य कामकाजाबाबत. | ग्रंथपाल पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना ग्रंथपालाशी संबंधित आवश्यक कामे शाळेकडून देण्याबाबत व ग्रंथालयाशिवाय अन्य कामे न देण्याबाबतच्या सूचना शिक्षणाधिकारी यांनी जिल्ह्यातील शाळांना निर्गमित कराव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ११. | वैयक्तिक प्रकरणे. | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार या प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न पुन्हा बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**